शुक्रवार दि.११ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ३८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड लोकनेता
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

## हरियाणात विकासनीती जिंकली

# महाराष्ट्रात महायुती जिंकणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

हरियाणातील लोकांनी त्यांचा अहंकाराचा ढोल फोडला. हरियाणामध्ये विकासनीती जिंकली आहे. महाराष्ट्रात देखील विकासनीती आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये आम्ही महाविकास आघाडीने बंद पाडलेले प्रकल्प पुन्हा सुरु केले. एकीकडे प्रकल्प सुरु केले तर दुसरीकडे राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग आणले. त्यामुळे रोजगार निर्माण झाला. तर तिसरीकडे कल्याणकारी योजना सुरु केल्या. महाविकास आघाडीने अडीच वर्षांत केलेले त्यांचे काम सांगावे, आम्ही देखील महायुतीने दोन वर्षांत केलेल काम सांगू. दूध का दूध, पाणी का पाणी होऊ द्या, असे आव्हान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. हरियाणामध्ये भाजपने ४८ जागा जिंकत बहुमत प्राप्त केले आहे. हरियाणात भाजपने सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली आहे. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया देत महाविकास आघाडीवर देखील निशाणा साधला आहे.

हरियाणात विकासनीती जिंकली असून आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात देखील याच नीतीवर महायुतीची सत्ता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, हरियाणातील लोकांनी त्यांच्या अहंकाराचा ढोल फोडला. हरियाणामध्ये विकासनीती जिंकली आहे. महाराष्ट्रात देखील विकासनीती आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये आम्ही महाविकास आघाडीने बंद पाडलेले अटल सेतू, कोस्टल, समृद्धी महामार्ग, मेट्रो तीन, कारशेड यांसह इतर अनेक प्रकल्प सुरु केले.

एकीकडे प्रकल्प सुरु केले तर दुसरीकडे राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग आणले. त्यामुळे रोजगार निर्माण झाला. तर तिसरीकडे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, युवा प्रशिक्षण योजना, मुलींची मोफत उच्च शिक्षण, शेतकऱ्यांना वीजबील माफ, तरुणांना काम, ज्येष्ठांना डीबीटीच्या माध्यमातून पैसे वयोश्री योजना अशा अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.महाविकास आघाडीने अडीच वर्षांत केलेले त्यांचे काम सांगावे, आम्ही देखील महायुतीने दोन वर्षांत केलेले काम सांगू. लेखा जोखा जनतेच्या दरबारात मांडू आणि दूध का दूध, पाणी का पाणी होऊ द्या, अशी टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवर केली आहे. हरियाणातील लोकांनी विकासावर मतदार केले आहे. विकानीती जिंकली आहे. महाराष्ट्रात देखील विकासनीतीच्या जोरावर महायुती जिंकणार, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.महाराष्ट्रातील जनता विकास करणाऱ्यांच्या, फिल्डवर काम करणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहते. महाराष्ट्रातील जनता घरी बसणाऱ्या, फेसबुक लाइव्ह करणाऱ्यांच्या पाठीशी उभी राहत नाही, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. आमच्या दोन वर्षांतील कामाची पोचपावती जनता आगामी विधानसभा निवडणुकीत दिल्याशिवाय राहणार नाही, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

---

## विचारांचे सोने लुटायला या वर्षी प्रथमच मीही येतोय

# भगवान भक्तीगडावर सावरगाव येथे संत भगवानबाबांचे आशीर्वाद घ्यायला तुम्हीही या


## दसऱ्याला भाऊ बहिण येणार एकत्र;नव्या समीकरणाची नांदी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात सावरगाव येथे दरवर्षी दसरा मेळाव्याचे आयोजन केले जाते.यंदा या दसरा मेळाव्याचे विशेष आहे ते यासाठीच की,गेल्या अनेक वर्षापासून भगवान भक्ती गडावर कृषी मंत्री धनंजय मुंडे हजेरी लावणार आहेत.या मेळाव्याकडे सर्वच राजकीय धुरीनांचे लक्ष लागले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून भारतीय जनता पक्षाचे दिवंगत मंत्री गोपीनाथ मुंडे यांनी दसरा मेळाव्याची प्रथा सुरू केली. प्रारंभी हा दसरा मेळावा बीड जिल्हा आणि अहिल्यानगर जिल्हा या दोन्हींच्या सीमारेषेवर असलेल्या भगवानगडावर होत असे.दरम्यानच्या काळात कैलासवासी गोपीनाथ मुंडे यांचे निधन झाल्यानंतर या भगवानगडावरील दसरा मेळाव्याला कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी हजेरी लावायला सुरुवात केली.राजकारणाची आणि समाजकारणाची किनार असलेल्या या दसरा मेळाव्याचं वैशिष्ट्य म्हणजे या मेळाव्याला राज्यातून आणि परराज्यातून मुंडे कुटुंबीयांवर







प्रेम करणारे आणि भगवान बाबांना मानणारे भाविक भक्तगण या ठिकाणी येत असतात. कृषी मंत्री धनंजय मुंडे आणि गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या पंकजा मुंडे यांच्यात मध्यंतरीच्या कालखंडामध्ये दुही निर्माण झाली होती.त्यामुळे पंकजा मुंडे यांनी आपला स्वतंत्र दसरा मेळावा संत भगवान बाबांचे जन्मस्थान असलेल्या सावरगाव भगवान भक्ती गड येथे सुरू केला. त्यानंतर यंदा प्रथमच धनंजय मुंडे या भगवान भक्ती गडावर दसरा मेळाव्यासाठी हजेरी लावणार आहेत.यासंदर्भातील माहिती त्यांनी स्वतःआपल्या एक्स अकाउंट च्या माध्यमातून दिली आहे. तसेच राज्यातील भगवान बाबा भक्तांना या भगवान भक्ती गडावर दसरा मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहनही केले आहे.त्यामुळे या मेळाव्यामध्ये दोघे बहिण भाऊ काय समाज बांधवांना संदेश देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

दसरा मेळावा हा जसा सामाजिक एकत्रीकरणाचा महत्त्वाचा प्रसंग असला तरी या माध्यमातून राजकारणाची गणिते ठरवली जातात.गेल्या अनेक वर्षापासून अहिल्यानगर आणि बीड या दोन्ही जिल्ह्यातील वंजारी समाज यांच्या एक गठ्ठा मतदानावर अनेकांची राजकीय भवितव्य ठरली जातात.यामध्ये शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदारसंघ,बीड जिल्ह्यातील विविध विधानस मतदारसंघांचा समावेश आहे.ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यासंदर्भात या मेळाव्यातून ओबीसी बांधवांना हाक देण्याचा प्रयत्नही होऊ शकतो.

---

# नायगाव विधानसभेतील तिन्ही तालुक्यात सहविचार सभेच्या माध्यमातून डॉ.विभुते यांना पाठिंबा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

सध्यस्थितीत निवडणूक आयोग अवघ्या काही दिवसात महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक घेण्याची घोषणा कधीही करू शकते त्यामुळे सर्वत्र उत्सुक उमेदवार आपापल्या परीने तयारीला लागले असून ८९ नायगाव विधानसभेसाठी देखील अनेक उत्सुक कामाला लागले आहेत, त्यामध्ये सर्वात पुढे अन लोकाभिमुख उमेदवार म्हणून डॉ. माधव विभुते यांचे नाव प्रकर्षाने पुढे आहे.



विधानसभा निवडणूक डॉ. विभुते यांनी लढवावी म्हणून मतदार संघातील सर्व जाती धर्माच्या नागरिकांतून मागणी होत असल्याने डॉ.विभुते यांनी त्यांचा शब्द प्रमाण मानत कामाला लागले असून त्यांनी स्व. बापूसाहेब गोरठेकर यांच्या जयंती ते पुण्यतिथी निमित्त नायगाव मतदार संघातील प्रत्येक खेडोपाडी गर्भवती मातांची रक्त तपासणी च्या माध्यमातून गाव स्तरावर पोहचले आहेत. गरोदर मातांची तपासणी करून त्यांना गरोदर काळात आवश्यक असणाऱ्या खानपान राहणीमान वैचारिक समतोल असा साधावा याचे मार्गदर्शन देखील केले आहेत. त्यामुळे विशेषत : माता भगिनींमध्ये त्याची लोकप्रियता वाढली आहे.

नायगाव मतदार संघातील लोकसंख्या लक्षात घेतली असता जवळपास लिंगायत व जंगम समुदाय हा जवळपास ६०००० असून स्वतः विभुते हे लिंगायत समाजाचे प्रतिनिधित्व करत असल्याने त्या अनुषंगाने नुकतेच त्यांनी धर्माबाद उमरी व नायगाव येथे लिंगायत व जंगम यांची सहविचार सभा घेत त्यांची मते जाणून घेतली असून सर्वांनी आपला पाठिंबा डॉ. विभुते यांना दर्शवला असून डॉ. विभुते जर निवडणूक लढवणार असतील तर आम्ही जीवाचे रान करू पण डॉ. विभुते यांना निवडून आणू असा शब्द दिले आहेत. डॉ. विभुते यांना मिळत असलेला पाठिंबा अन प्रेम यातून ते नायगाव विधानसभेत एक सक्षम उमेदवार म्हणून नावारुपास येत आहेत, हे मात्र खरे डॉ विभुते यांच्या जिवनात स्व. बापूसाहेब गोरठेकर यांचे मोठे स्थान असून ते सर्वत्र गोरठेकर यांचे मानसपुत्र म्हणून परिचित असून स्व.गोरठेकर यांनी दिलेला शब्द कधीच फिरवला नाही त्यामुळे त्यांची एक वेगळी प्रतिमा मतदार संघात आहे, वेळप्रसंगी त्यांनी आपल्या पदरचे पैसे खर्च केले मात्र कधी भाकरी फिरवली नाही अश्या आदर्श विचारांचा वसा घेऊन ते राजकीय क्षेत्रात दमदार पाऊल टाकत आहेत, असेही नागरिकांतून चर्चील्या जात आहे.नायगाव मतदार संघात अनेक धनदांडगे उमेदवार हे गुडघ्याला बाशिंग बांधून निवडणूक लढवण्यासाठी तयार आहेत मात्र त्याला अपवाद हे डॉ. विभुते आहेत त्याचे कारण म्हणजे परी हॉस्पिटलच्या माध्यमातून त्यांनी उमरी येथे चांगली वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण मतदार संघात पैश्याच्या माध्यमातून नव्हे तर जनसेवेच्या माध्यमातून त्यांनी आपली स्वतःची एक विशेष प्रतिमा तयार केली आहेत, आगामी विधानसभा निवडणुकित ते अहंम नमामि ह्या प्रवृत्तीवर भारी पडतील यात शंकाच नाही.

---

## निधन वार्ता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**



भोकरदन तालुक्यातील दानापुर येथील शेख मसूद शेख शफीक वय ७० वर्ष यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या वर दानापुर येथील कब्रस्तान मध्ये दिनांक ९ / १०/ २०२४ रोज़ी सकाळी ९.०० वाजता दफ़नविधि करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा दोन मुली ,सुना,नातवंड असा मोठा परिवार आहे.दानापुर येथील पुढारी चे पत्रकार शेख सलीम यांचे वडील होत.

## चारोळी

**नवरात्रीचा जागर करुनी**
**आई आम्ही तुझ्या चरणाशी लीन**
**तुझ्या लेकींवर कृपा असू दे**
**येऊ देत तिच्या सौख्याचे दिन.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

---

# महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत श्रीगोंदा तालुक्याला युती सरकारच झुकतं माप–विक्रमसिंह पाचपुते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा तालुक्यातील ५३१ कोटी ९३ लाखांच्या तीन रस्त्यांचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आभासी प्रणाली द्वारे भूमिपूजन शुक्रवार दिं ११ रोजी श्रीगोंदा येथील मांडवगण रस्त्यावरील जोधपूर मारुती चौकात होणार असल्याची माहिती भाजप युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमसिंह पाचपुते यांनी दिली.



यावेळी उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजित पवार, महसूल मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे, खा.निलेश लंके यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.रविंद्र चव्हाण हे आहेत. आशियाई विकास बैंक सहाय्यित प्रकल्प महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव, श्रीगोंदा रस्ता प्रजिमा–६२, काष्टी, श्रीगोंदा, देऊळगाव, मांडवगण रस्ता प्रजिमा–६३ या ३६४ कोटी १८ लाख रुपयांच्या तर कोळगाव, सुरोडी, वडाळी मार्गे श्रीगोंदा पेडगाव रस्ता प्रजिमा–६२ या १६७ कोटी ७५ लाख रुपयांच्या रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर झाला असून या रस्त्याचे भूमिपूजन मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आभासी प्रणाली द्वारे होणार आहे. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन माजी मंत्री आ.बबनराव पाचपुते यांच्या वतीने भाजप युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमसिंह पाचपुते यांनी केले. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष संदीप नागवडे, उपअभियंता विजय होके, माजी सरपंच दत्तात्रय डांगे, सचिन चौधरी यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

---

# श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात आघाडीत बिघाडी होण्याची दाट शक्यता तर युती मध्ये मात्र अलबेल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात मागील काही दिवसांपासून आघाडीच्या उमेदवारी साठी चांगलीच रस्सीखेच चालू आहे मागिल दोन दिवसांत राष्ट्रवादी शरद पवार गटाची उमेदवारी मलाच फायनल असल्याचे राहुल जगताप यांनी सांगितले व शनी चौकात फटाके फोडून कार्यकर्त्यांनी जल्लोष केला याला दोनच दिवस होतात ना होतात तोच काल शिवसेना उपनेते साजन पाचपुते यांनी ही उमेदवारी मलाच फायनल असल्याचे सांगितले व साजन पाचपुते यांच्या कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत फटाके फोडून जल्लोष केला तर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते घनश्याम शेलार हे सुद्धा उमेदवारीसाठी देव पाण्यात घालून









बसले आहेत आता उमेदवारी मीळणार कोणाला हे मात्र आघाडीच्या नेत्यांनी गुलदस्त्यात ठेवले आहे त्यामुळे सध्यातरी दावे प्रती दावे केले जात आहेत तालुक्यातील मतदारांचे मात्र चांगलेच मनोरंजन होत आहे मात्र कार्यकर्ते कोणता झेंडा घेऊ हाती असेच गोंधळलेल्या अवस्थेत दिसतं आहेत परंतु तालुक्यात सद्य परिस्थितीत मात्र राष्ट्रवादी शरद पवार गटाचेच आघाडीच्या उमेदवारी बाबत पारडे जड असल्याची माहिती समोर येत आहे त्यामुळे राहुल जगताप यांनाच उमेदवारी मीळणार असल्याचा दावा केला जात आहे तर युतिची उमेदवारी पाचपुते कुटुंबात विक्रमसिंह पाचपुते यांना फायनल असल्याने तालुक्यात जगताप विरुद्ध पाचपुते हिच खरी लढत होणार आहे तर अनुराधा नागवडे मात्र कोणता झेंडा घेऊ हाती अश्या अवस्थेत आहेत नाही उमेदवारी मीळाली तर प्रसंगी अपक्ष उमेदवार म्हणून लढण्याच्या तयारीला लागले आहेत परंतु जरी अपक्ष उमेदवारी केली तरी मतदार यांना स्विकारणार का हा खरा प्रश्न आहे कारणं मतदार सुध्दा हुशार आहेत अपक्ष जरी आमदार झाले तरी तालुक्याला विकास निधी उपलब्ध होणार नाही हे मतदारांना चांगलेच माहीत आहे त्यामुळे जगताप विरुद्ध पाचपुते असाच सामना श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघात रंगणार असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे.

# अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी शैक्षणिक किटचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जुन्नर । मयूर ढोबळे**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने क्षेत्रीय संचालक, क्षेत्रीय संचालनालय, आणि खेल व युवा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता ही सेवा-२०२४ या अभियानांतर्गत स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या उपक्रमातील माय भारत या कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी शैक्षणिक किट चे वाटप करण्यात आले. अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. निलेश काळे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी दिली. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि डिंगोरे विद्यालयातील माजी निवृत्त शिक्षक श्री. विठ्ठल शितोळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. निलेश काळे यांनी दिनांक: १७ सप्टेंबर, २०२४ ते ०२ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीमध्ये स्वच्छता ही सेवा-२०२४ या अभियानांतर्गत स्वभाव स्वच्छता,संस्कार स्वच्छता या उपक्रमात राबवण्यात आलेले विविध कार्यक्रम त्याचबरोबर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी सदर उपक्रमांतर्गत देण्यात येणारे शैक्षणिक किट याविषयी सविस्तर माहिती दिली. शैक्षणिक किटमध्ये टोपी, डायरी आणि पेन यांचा समावेश होता. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले श्री. विठ्ठल शितोळे यांनी आपल्या मनोगतामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या वेगवेगळ्या योजना राबवते त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या विकासात नक्कीच भर पडते. विद्यार्थ्यांनी देखील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राबवत असलेल्या अशा विधायक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून



आणावा. असे आव्हान केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी आपल्या मनोगतामध्ये आपल्याला जर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल तर विद्यार्थी हा स्वच्छतेचा पुरस्कर्ता असला पाहिजे. महात्मा गांधींनी प्रसंगी स्वातंत्र्य थोडे उशिरा मिळाले तरी चालेल मात्र लोकांच्या अंगी स्वच्छता हा गुण सर्वप्रथम यायला हवा. कारण स्वच्छता हा आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला पाहिजे ती आपली सवय झाली पाहिजे. तरच आपण सुसंस्कृत, निरोगी भारत घडवू शकतो. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थ्यांच्या विकासासाठी राबवत असलेले विविध प्रकारचे विधायक उपक्रम नक्कीच कौतुकास्पद आहेत. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महाविद्यालय नेहमी प्रयत्नशील असते किंबहुना महाविद्यालयाचे ते आद्य कर्तव्य आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व कार्यक्रमाधिकारी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने आपल्यावर दिलेली जबाबदारी पार पाडत आहेत हे सांगून समाधान व्यक्त केले. त्याचबरोबर पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के.डी. सोनावणे, उपप्राचार्य डॉ. रमेश शिरसाट, भूगोल विभागाचे प्रमुख प्राध्यापक (डॉ.) ए. टी. पाडवी, डॉ. अनिल लोंढे, डॉ. रमाकांत कसपटे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनील लंगडे, डॉ. रमेश काशिदे आदी प्राध्यापक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र आंबवणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा .सुवर्णा डुंबरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. विनायक कुंडलिक आणि शिक्षकेतर कर्मचारी श्री. निखिल काकडे श्री.मिलिंद ढगे यांनी विशेष सहकार्य केले.

# चांगेफळ येथील स्वस्त धान्य दुकानदाराची मनमानीला कंटाळून ग्रामस्थांचे उपोषण

## आजचा उपोषणाचा दुसरा दिवस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

तालुक्यातील चांगेफळ येथील स्वस्त धान्य दुकानदार यांनी गावातील लाभार्थी यांना धान्य कमी देणे अनेक लाभार्थी यांचे नाव कमी दुकान वेळेवर न उघडणे लाभार्थी यांनी माहिती विचारली असता अरेरावीची भाषा वापरणे,राशनचे धान्य व्यापाऱ्यांना विकणे अश्या तक्रारीचे निवेदन देऊनही कारवाई न झाल्याने लाभार्थी चांगेफळ येथील ग्रामपंचायत कार्यालय समोर ९ ऑक्टोंबर पासून उपोषणाला बसले आहे. आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे.



आम्ही चांगेफळ येथील रहिवासी असून आमच्या सर्वांचे राशन कार्ड राशन दुकानदार श्री शरद देविदास मोगल यांच्या दुकानाला जोडले आहेत. गेल्या अनेक दिवसापासून आम्ही गावातील सर्व तक्रारदार राशन दुकानदार यांच्याकडून राशन घेण्यासाठी खूप त्रस्त झालो आहोत. कुठल्याच प्रकारे योग्य राशन न देणे. राशन कार्ड वर असलेले कुटुंब धारक यांच्या नावे आलेले धान्य आम्हाला देत नाही. गोरगरीब व अनुसूचित जातींच्या आमच्या सर्व लाभार्थ्यांना अरेरावीची भाषा करणे, चालू राशन कार्ड कुठलीही पूर्वसूचना न देता शासन स्तरावरून बंद करणे, राशन वाटप करायचे झाल्यास गावातील लोक शेतात गेल्यानंतर दुकान उघडणे, दुकान केव्हा उघडणार आहे असे विचारल्यास अरेरावीची भाषा करून धक्काबुक्की करणे, बाहेरगावच्या व्यापाऱ्यांना राशन विकणे अशा अनेक प्रकारचा भ्रष्टाचार राशन दुकानांमध्ये करून सदरील दुकानदाराने लाभार्थ्यांची प्रचंड आर्थिक लूट करून सामाजिक पिळवणूक सुद्धा केली आहे. बाहेरगावी व्यवसाय करून हा राशन दुकानदार कुठल्याच प्रकारे राशनधारकांना सहकार्य न करता नियमबाह्य पणे राशन दुकान चालवत आहे. आम्ही सामान्य नागरिकांनी जाब विचारल्यास नेहमी आरेरावीची भाषा करतो. माझ्या एवढी जमीन या गावात सुद्धा कोणाला नाही. माझं दुकान निलंबित जरी झालं तरी मला काही गरज नाही. राशन दुकानदार यांचा गावातील राजकारणामध्ये दबदबा असल्याकारणाने, राशन दुकानदार यांचे भाऊ व कुटुंबातील इतर लोक आम्हा राशन धारकांना प्रचंड दमदाटी करून कोणी तक्रार केल्यास घरी जाऊन जीवे मारण्याची धमकी देतात. तसेच आज पर्यंत कुठल्याच राशन धारकाला पावती दिली नाही. तसेच या आधीसुद्धा या कानदारावर निलंबनाची कार्यवाही झाली होती. परंतु राजकीय वशिला वापरून या दुकानदाराने परत मिळवले होते. या सर्व कारणाने आम्ही सर्व राशन धारक खूप तणावा मध्ये आहे. तरी या प्रकरणी योग्य ती चौकशी करून या दुकानदारावर कारवाई करण्यासाठी विलास दुर्योधन शेजुळ,दिपक छगनराव मोगल, रामेश्वर आसाराम परळकर, दिनकर केशवराव सवडे, दत्तात्रय गुमनराव सवडे,मोहण सतयविजय शेजुळ सतिष नाथाभाऊ मोगल,अमोल दत्तात्रय दुधारे हे उपोषणाला बसले आहे.

# लोकजागर संघटनेचे अध्यक्ष श्री केशव पाटील जंजाळ यांनी दिला बँकेला कुलूप ठोकण्याचा इशारा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

दानापूर येथील बँक ऑफ महाराष्ट्र या शाखेबाबत परिसरातील सर्व शेतकऱ्यांच्या माहितीनुसार गेल्या तीन ते चार महिन्यापासून घधउ होत नाही. व नवीन पीक कर्ज सुद्धा वाटप झालेले नाही तसेच शासकीय अनुदानाला लावलेला होल्ड काढलेला नाही या सर्व प्रश्नांवरती श्री केशव पाटील जंजाळ यांनी शाखा व्यवस्थापक यांना जाब विचारला असता त्यांनी उडवा उडवी चे उत्तर दिली श्री केशव पाटील जंजाळ यांनी पुढच्या सात ते आठ दिवसात या परिसरातल्या सगळ्या शेतकऱ्यांना नवीन पिक कर्ज वाटप करावे नाही तर बँकेला कुलूप ठोकले जाईल व ती जबाबदारी प्रशासनाची राहील याबाब भोकरदन तहसीलदार व पोलीस निरीक्षक भोकरदन यांना निवेदन देत आहोत. तात्काळ हे तिन्ही प्रश्न मार्गी लावा अन्यथा परिणामाला सामोरे जावे असा इशाराचे केशव पाटील यांनी शाखा व्यवस्थापकांना दिला.

# सिंदखेड राजा येथे तरुणाचे अनोखे आंदोलन

## धनगर समाजाला एस टी संवर्गातून आरक्षण भेटण्यासाठी तरुणाचे बिएसएनएल टॉवर वर रात्रीच्या १२ वाजे पासून आंदोलन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**


धनगर समाजाला एसटी मधून आरक्षण मिळावं यासाठी सिंदखेडराजा येथे बीएसएनएल टावर वरती दिनांक ९ ऑक्टोंबर रोजी रात्री एक युवक चढून आंदोलन करत आहे. रात्री बारा वाजेला तो या टॉवर वरती चढला आहे जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही तोपर्यंत टॉवरच्या खाली येणार नाही. अशी माहिती त्याने खाली कळवली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र राज्यात धनगर समाजाला एस टी प्रर्वगात समावेश करण्यासाठी धनगर समाजाने अनेक आंदोलने केली आहे तसेच नुकतेच मा जिजाऊ च्या नगरीत तहसील कार्यालयावर मेंढी मोर्चा काढण्यात आला होता याची साधी दखलही राज्य सरकारने घेतली नसल्याने गजानन बोरकर सारंगपुर,यशवंत सेना बुलढाणा जिल्हा संपर्क प्रमुख यांनी सिंदखेड राजा येथील बिएसएनएल टॉवरवर चढून यळकोट यळकोट जय मल्हार अश्या घोषणा देऊन धनगर समाजाला एस टी समाजात आरक्षण भेटण्यासाठी घोषणा देत आहेत व जोपर्यंत समाजाला एस टी प्रर्वगात समावेश करत नाही तोपर्यंत टॉवरवरून खाली उतरणार नसल्याचा पवित्रा घेतला आहे. सदर घटनेची माहिती प्राप्त होताच सिंदखेड राजा तहसीलदार अजित दिवटे यांनी आंदोलन ठिकाणी धाव घेतली. समाजाचे माजी नगरसेवक फकिरा सेठ जाधव, बळुभाऊ म्हस्के, रामप्रसाद लोकरे, सुनिल गोरे, गंगाराम भुसारी, विनोद भुसारी, पांढरी विर, राजू आढाव,यांनी

आंदोलकासोबत चर्चा केली, सिंदखेड राजा पोलीसांना ही माहिती प्राप्त होताच पोलीस कर्मचारी यांनी सदर आंदोलकांना खाली उतरण्यासाठी सुचित करण्यात आले मात्र सदर आंदोलक आरक्षण भेटे पर्यन्त खाली उतरणार नाही यावर ठाम होता.

## हिमत असेल तर कारखाने उभा करून रोजगार देवून दाखवा : कवळे गुरुजी

# जिल्ह्यातील इतर कारखान्यापेक्षा शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्तीचा भाव दिलो-मारोतराव कवळे गुरूजी









■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । प्रतिनिधी**

मी शेतक-यांचा मुलगा असल्याने शेतक-याची वेथा काय असते ते मला समजते म्हणून जिल्ह्यातील इतर साखर कारखान्या पेक्षा शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्तीचा भाव देऊन ऊस कारखान्याला घेतला.आणी त्यांचे तात्काळ त्याच्या खात्याला नगदी पैसे दिले.विरोधकांनी माझ्यावर गरळ ओकणाऱ्या विरोद्धकानी आदी कारखाना उभा करून रोजगार उपलब्ध करून घ्यावा माझ्या रक्तात गदारी बेईमानी नाही पण विरोद्धकावर टिका टिपनी करून अंगावर शिंतोडे उडवून घ्यायचे नाही असे विरोद्धकावर राजकीय टोलेबाजी करीत ऊसाच्या बॉयरल अग्नी प्रतिपन व गव्हाण पुजन वेळेस मारोतराव कवळे गुरुजी यांनी.यावेळी लोकसभा व विधानसभेचे राजकीय बॉयलर पेटले आहे. डॉ शंकरराव चव्हाण जागरी ड ग्रो प्राडक्ट प्रा लि कुसुमनगर वाघलवाडा कारखाना येथे व्दितीय बॉयलर प्रतिपन गव्हाण पुजन सन २०२४ २५ सोहळा दि ९ ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानी चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी तर प्रमुख मार्गदर्शक पाहुणे व सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन तथा विद्दमान खासदार नितीनकाका पाटील जाधव, प पू श्री श्री १०८ महंत युदुबन गंभीरबन महाराज कोलंबीकर, प पू श्री आनंदपूरी महाराज चोळाखा, पपू बामेराज महाराज कपाटे बिजेगाव, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, विजयअप्पा उतरवार, गणेश पाटील कवळे, कवी जगण दादा शेळके,संचालक अनिल दर्डा मलिकअर्जुन चंदापूरे, गणपतराव पाटील हस्सेकर, बापूराव पाटील करकाळेकर , गोंविद अप्पा नलबतवार, किशोर पबितवार, सीईओ संदिप पाटील कवळे, परमेश्वर पाटिल कवळे, गणेश पाटील ढोलउमरीकर , आदी मान्यवर उपस्थित होत.

प्रारंभी प्रगतशिल शेतकरी शिवाजी जकोजी कदम यांच्या सुविधा पत्नी सह प्रथम बॉयलर पुजन करण्यात आले तर गव्हाण यांचे पुजन शेतकरी गोंविद म्याकलवाड बितनाळकर यांच्या हस्ते झाले. कारखान्याचे व्यवस्थापक श्रीराम अंबटवार यांनी सविस्तर असे लेखा जोखा यांची प्रस्तावणातुन सादर केले. यावेळी उद्योजक तथा कारखान्याचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी पुढे म्हणाले पश्चिम महाराष्ट्र ऊस कारखाना आणि मराठवाडा कारखान्याचा भावाचा फरक असतो तेथिल शेतकरी अधुनिक तंत्रज्ञानाने ऊसाची लागवड

मशागत करतात त्यामुळे ऊसाच्या भावात फरक पडतो हे अगोदर शेतकरी समजून घेतले पाहिजे ती पद्धत जिल्हातील शेतकरी यांनी अवलंबिले पाहिजे तसे तर ऊसाला शेतक-यांनी स्वता तोडून ऊस कारखान्याला दिला तर ३५०० रुपये भाव देऊच तसे जास्तीचा जिल्ह्यात भाव देणारा व्ही पी के साखर कारखाना आहे त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी विरोध्दकांचे न ऐकता बळी न पडता चर्चा करावी. विरोद्धकांना चॅलेज आहे की कारखाना प्रोजक्ट उभारून तरुनाला रोजगार उपलब्ध करून देत कारखाना ऊभारून जास्तीचा भाव देवून दाखवा हेच कवळे गुरुजी त्यापेक्षा भाव जास्तीचे देईल. कांही विरोद्धक गुरुजी च्या कारखान्यावर काटा त मध्ये फरक आहे ऊसाला भाव कमी देतो शिक्षक म्हणून पुकट पगार उचले, तो विज चोर आहे, असे बिनबुडाचे अरोप करून जनतेची दिशाभूल करत आहेत त्यांना हा कारखाना बंद पडवा म्हणून पोटसुळीने अरोप करीत आहेत. असे बोलत गुरुजी भर सभेत समाचार घेत त्यांच्या हाताखाली शिकले त्या विद्यार्थाकडून मी शाळेत वेळेवर उपस्थित राहत होतो की नाही शाळेत

शिकवत होतो नाही हे वधवून घेतले मी पुकटचा पगार घेतलो नाही विज चोरी केलो नाही माझ्या रक्तात गद्दारी बेईमानी नाही मी शेतक-यांचा मुलगा असल्याने प्रथम समाजाचा घटक म्हणून शेतकरी, देशाचा रक्षक म्हणून सैनिक यांना सल्यूट करत सन्मान करतो. ज्याला हारामाचे पैसा कसा जास्त जमला की ज्याचे विचार तशी त्यांची दुष्टी बुध्दी असते आणि त्याच नजरेने दुसऱ्याकडे पहातात म्हणून गुरुजीने ऊसाच्या गोडव्या प्रमाणे राजकीय विरोद्धकावर नाव घेता सडेतोड उत्तर देवून समाचार घेतला आहे. प्रमुख पाहुणे साताराचे खासदार नितीनकाका पाटील जाधव म्हणाले गुरुजी राजकारणात विरोद्धक टिका करतात तुम्ही चांगले काम आणी प्रमाणीक करता जसे जसे तुम्ही मोठे व्हाल तसे तसे विरोद्धकाकडून टिकाशस्त्र वाटते त्यामुळे मी तुमच्या पाठीशी आहे तुम्ही शेतकरी यांच्या हिताचे विकासाची दुरदुष्टी ठेवून कामे करीत रहावे जाता जाता एक सांगतो शेतकरी आर्थिक बाजुने बळकट होण्यासाठी ऊस पिका शिवाय पर्याय नाही अशी गुरुजीचे कौतुक करून राजकीय क्षेत्रात विजयीभव म्हणून शुभेच्छा दिल्या आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुयड गुरुजी ढोलउमरी तर आभार युजी कदम यांनी मानले.

### शिष्यवृत्ती गुणवंतांचा रायगडावर शिवदुर्गप्रेमी प्रतिष्ठान च्या वतीने सन्मान

# शिक्षक सक्षमीकरण आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रतिष्ठानचे उपक्रम प्रेरणादायक-शिक्षणाधिकारी श्री.नाईकडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । प्रतिनिधी**

शिष्यवृत्ती परीक्षेच्या महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्ता यादीत पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक विद्यार्थी चमकले असून यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान सोहळा हिंदवी स्वराज्याची दुसरी राजधानी दुर्गराज रायगडच्या राज सदरेवर करत शिवदुर्ग प्रेमी प्रतिष्ठान ,शिरूर (पुणे) ने राज्यात प्रेरणादायी आदर्श निर्माण केला असल्याचे गौरवोद्गार पुणे जिल्ह्याचे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी श्री. संजय नाईकडे यांनी काढले. वृक्षारोपण, गडकिल्ले भ्रमंती, किल्ले सफाई व संवर्धन, रक्तदान शिबिर आयोजन, ऐतिहासिक चित्रपट पाहणे, शिव- शंभू प्रश्नमंजुषा स्पर्धा, पन्हाळा पावनखिंड सारख्या ऐतिहासिक मोहिमा, किल्ले बनविणे इ. शिक्षक सक्षमीकरणासाठी प्रतिष्ठान राबवीत असलेले विविध उपक्रम प्रेरणादायक व कौतुकास्पद असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

सांगलीच्या निवासी उपजिल्हाधिकारी सौ. ज्योती नाईकडे पाटील यांनी बालपणी श्रीमानयोगी च्या वाचनातून समजलेले शिवराय व शिक्षक असलेल्या आपल्या आई-वडिलांकडे हट्ट करून केलेल्या रायगड सहलीचा अनुभव सांगत छत्रपतींचे कार्य, राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी राजे ,येसूबाई , यांच्या जीवनातील अनेक घटनांवर प्रकाश टाकत रायगड याचा साक्षीदार असल्याचे सांगितले. छत्रपती शिवरायांच्या कार्याचा आदर्श प्रत्येक विद्यार्थ्याने घ्यावा. वाचनातून तसेच आपल्या शिक्षकांकडून शिवचरित्र समजून घ्यावे,असे सांगताना विद्यार्थ्यांच्या सन्मानासाठी रायगडची निवड केल्याबद्दल प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे कौतुक केले. शिरूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री. बाळकृष्ण कळमकर यांनी ट्रेकिंगचे आपले अनुभव विशद करताना भविष्यातही प्रेरणादायी उपक्रम राबवण्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी खेडचे गटशिक्षणाधिकारी श्री.अमोल जंगले, पदवीधर शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष अनिल पलांडे, जिल्हाध्यक्ष शांताराम नेहेरे, खेड तालुका अध्यक्ष नारायण करपे, सरचिटणीस श्री.बाबाजी शिंदे, हुतात्मा राजगुरू भक्त मधुकर गिलबिले, शिरूर तालुका अध्यक्ष अशोक कर्डिले, खेड तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे नेते श्री. अविनाश शिंदे हे आवर्जून उपस्थित होते.

जानेवारी २०२४ मध्ये शिवदुर्गप्रेमी प्रतिष्ठानने पुणे जिल्ह्यातील अधिकाधिक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीत येण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन करत रायगड ची मोफत सहल घडविण्याचा शब्द दिला होता. यावर्षीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत चमकलेले पुणे जिल्ह्याचे इयत्ता पाचवीचे ५२ तर इयत्ता आठवीचे ३२ विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षक यांना रायगडावरील राज सदरेवर मानाचा फेटा,प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह,छत्रपती शिवरायांवरील पुस्तक भेट देत सन्मान करण्यात आला.



रायगडावरील राणीवसा, बालेकिल्ला, दरबार , खलबतखाना, होळीचा माळ, बाजारपेठ, टकमक टोक, जगदीश्वर मंदिर ,महाराजांची समाधी ,हिरकणी बुरुज या ठिकाणांची ऐतिहासिक दाखल्यासह माहिती सचिन पवार आणि गाईड यांनी दिली. सुमारे ७०० शिक्षक या प्रतिष्ठानचे सभासद असून मोहिमेतील प्रवास ,निवास, नाश्ता, सन्मान साहित्य इत्यादी सर्व बाबींचा खर्च शिक्षकांनी वर्गणीतून केला. ओंकार स्पोर्ट चे श्री. प्रकाश घोलप सर यांनी सर्व विद्यार्थ्यांसाठी शिवरायांची छबी असलेले आकर्षक टी-शर्ट भेट दिले तर तन्मय टूर्स अँड ट्रॅव्हल्स चे श्री. कैलास ताठे यांनी एक बस मोफत दिली. श्री .भाऊ मेंगडे यांनी फोटोग्राफी सौजन्य दिले. श्री तुषार वाटेकर, विजय गोडसे, शहाजी पवार यांनी आकर्षक फेटे बांधले. कार्यक्रमास गुणवंत विद्यार्थी मार्गदर्शक आणि पुणे जिल्ह्यातील सुमारे २५० शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गिरीभ्रमर ग्रुप, राजगुरुनगर चे हनुमंत जगताप, दत्तात्रय बोडरे अमोल सांडभोर यासोबत प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री .उमेश धुमाळ, खजिनदार श्री.सुनिल पलांडे, कार्याध्यक्ष श्री. लक्ष्मण जाधव, ड. युवराज थोरात, रामचंद्र नवले, प्रथमेश टाकळकर, अशोक बोखारे, सुधाकर मंचरकर यांनी परिश्रम घेतले. नवोदय विद्यालय पुणे चे प्राचार्य श्री. खेडकर यांचेही याकामी मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संतोष पवार व रवींद्र निंबाळकर यांनी केले तर आभार सचिव श्री.मंगेश येवले यांनी मानले. श्री.अनिल पलांडे आणि सर्व विद्यार्थ्यांच्या शिवरायांच्या आरती गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जागतिक टपाल दिनी पंतप्रधान,मुख्यमंत्र्यांना कंधारच्या चिमुकल्यांनी पाठवले पत्र

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

जगात १८७४ या वर्षी २२ देशात टपाल सेवेला सुरुवात झाली.पण १९६९ पासून जागतिक टपाल दिन साजरा करण्याची पध्दत सूरू झाली.वर्तमान काळ हा विज्ञानाभिमुख असल्यामुळेच सोशल मीडिया,वेबसाइट, मेलचे अधुनिक युग प्रगतीपथावर आहे.

आमच्या भारतीय डाक सेवेचे अनेक माध्यम इतिहासाच्या गर्तेत नामशेष झाले आहेत.या अधुनिक काळातल्या शालेय विद्यार्थ्यांना डाक सेवेचे पोस्टकार्ड, अंतर्देशियपत्र,लिफाफा,मनी ऑर्डर,पोस्टाचे तिकीट अशा माध्यमांची तोंड ओळख सध्याच्या होकमपट्टीच्या अधुनिक विद्यार्थ्यांना अनुभव घेता यावा म्हणुन हा उपक्रम टपाल दिन म्हणून साजरा करण्यात आला.

ऐतिहासिक कंधार शहरातील नामांकित अशी श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधार संस्थेतील मातृशाळा श्री शिवाजी हायस्कूल ह.माणिकराव काळे रोड कंधार ज्ञानालयात आज ९ ऑक्टोबर २०२४ रोजी जागतिक टपाल दिनी १०१ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची आन-बान-शान असलेली मायबोली महाराष्ट्र भाषेला प्रधानमंत्री नरेंद्रभाई मोदी व त्यांच्या केंद्रीय मंत्रीमंडळाने अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली अभिजात भाषेची मागणी मान्य करीत अभिजात भाषेचा दर्जा दिला.त्या बद्दल पंतप्रधान मोदींना आभाराभिनंदन पत्र लिहून मानाची कोटी-कोटी जयक्रांती विद्यार्थांनी केली.दुसरे अभिनंदन पत्र महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री नामदार एकनाथराव शिंदे साहेब व त्यांच्या मंत्रीमंडळाने कंधार तालुक्यातील फुलवळ एम.आय.डी.सी.या परीसरात शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस मन्याड खोर्यातील ढाण्या वाघ,ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी,माजी खासदार व आमदार,महाराष्ट्राचे नव्हे भारतातील शिक्षण महर्षि,विद्रोही विचारवंत, आदर्श संपादक, उत्कृष्ट साहित्यिक सन्माननीय डॉ.भाई केशवराव धोंडगे यांचे नाव देऊन डॉ.भाई केशवराव धोंडगे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण करुन इतिहास घडविणारे आणि जतन करणारे व्यक्तीमत्व आदरणीय डॉ.भाई केशवराव धोंडगे यांचा गौरव केला.त्या बद्दल १०१ विद्यार्थ्यांनी पोस्टकार्ड, अंतर्देशियपत्र,लिफाफा या माध्यमा व्दारे आभाराभिनंदन करुन मानाची कोटी-कोटी जयक्रांति करणार्यास कंधार डाक सेवेचे प्रमुख अधिकारी आदरणीय दीपकराव पोटदुखे सर सोबत आदरणीय प्रदीप जायभाये सर यांची प्रमुख उपस्थिती होती.या मानवरांचा हृदय सत्कार शाळेचे मुख्याध्यापक सदाशिवराव आंबटवाड सर आणि उपप्राचार्य प्रा.मुरलीधर घोरबांड सर, उपमुख्याध्यापक सुरेश ईरलवाड सर, प्रभारी पर्यवेक्षक ऐनोद्दीन शेख सर यांच्या समर्थ हस्ते सत्कार करण्यात आला.




**सोशल मीडियावर जमान्यात गत इतिहासाच्या गर्ते विसावलेले डाक माध्यमाचा प्रचार अन् प्रसार करण्यासाठीच सृजनशील उपक्रमाचे संयोजक गोपाळसुत दत्तात्रय एमेकर गुरुजी,यांनी आयोजन करुन विद्यार्थ्यांना अनुभवातून सृजनशीलतेत रमण्यासाठी श्री शिवाजी हायस्कूल ह.माणिकराव काळे रोड कंधार या ज्ञानालयात जागतिक टपाल दिन साजरा करतांना सन्मानीत पंतप्रधान आणि मुख्यमंत्री या पत्र पाठविण्याचा अनुभव त्यांना आकाश ठेंगणे करुन गेला!**

विद्यार्थ्यांकडून पत्र लिहून पोस्टाच्या लाल रंगाच्या पत्रपेटीत पत्र टाकण्याचा अनुभव विद्यार्थांनी प्रथमच घेतला.यात कु.अन्वयी जाधव, कु.आराध्या अंबुलगेकर, कु.अनन्या,राठोड,कु. सोनल कोतवाल,कु.मेंढके,श्रेया सातापूरे,श्रेया मुसळे,कु.कागणे,कु.शीतल पेठकर, कु.सूर्यवंशी,कु.सोनाक्षी सर्जे,कु.पेठकर,बाल चित्रकार रमाकांत जोंधळे,बुध्दभुषण ढवळे, साहित्यिका सौ अंजलि कानींदे/मुनेश्वर, यांनी या पत्र लेखनात सहभाग घेवून कल्पक, सृजनशील एमेकर गुरुजी यांच्या पुढाकाराने जागतिक टपाल दिन साजरा करण्यात आला.

# उमेद चे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन सिंदखेडराजा येथे संपन्न

## राज्यभरातील ५० ,००० महिलांचा सहभाग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



दिनांक ९ ऑक्टोंबर रोजी जिजाऊ सृष्टी सिंदखेड राजा येथे उमेद अभियान महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटना यांच्यावतीने उमेद अभियान स्वतंत्र करून उमेद कर्मचारी आणि केडर यांना कायम स्वरुपी करण्यात यावे या मागणीसाठी ५० हजार कर्मचारी यांच्या उपसथिती मध्ये पहिल्यांदाच राज्य अधिवेशनचे आयोजन करण्यात आले होते. या अधिवेशना साठी राज्यभरातील कानाकोपऱ्यामधुन महिला कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. लाडकी बहीण योजनेअंतर्गत आशा यांना पन्नास हजार रुपये देण्यात आले हा अन्याय असून उमेदवार स्वतंत्र दर्जा देण्यात यावा व जे कंत्राटी कामगार आहेत त्यांना शासनाने कायम करावे अशा विविध मागण्यांचे ठराव यावेळी अधिवेशनामध्ये पास करण्यात आले ' यावेळी अनेक राजकीय नेत्यांनी आपली पोळी भाजून घेतली अनेक पक्षाचे राजकीय प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते यामध्ये माजी आ शशिकांत खेडेकर, मा.आ.चंद्रकांत दानवे, .आ.तोतारामजी कायंदे अंजलीताई आंबेडकर वंचित बहुजन आघाडी नेत्या, सविताताई मुंढे वंचित नेत्या सिद्धार्थ जाधव शहर अध्यक्ष सिंदखेड राजा काँग्रेस,यांनी अधिवेशनात मांडलेल्या विषयाला पाठिंबा देऊन शुभेच्छा दिल्या.स्वप्नील शिर्के राज्य अध्यक्ष उमेद कर्मचारी संघटना, रुपाली नाकाडे राज्य अध्यक्ष महिला कार्यकारिनी,निर्मला शेलार,रुपेश मर्चन्ट, नवनाथ पवार, बाबासाहेब सरोदे,संदीप दाभाडे,श्याम खोंड, विक्रांत जाधव,विजय चव्हाण इतर सर्व कर्मचारी व कॅडर उपस्थित होते.ह्या कार्यक्रमासाठी अमर जाधव,किशोर झोटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### भाजपला सत्ता गमवण्याची भीती

# त्यामुळेच विरोधी पक्षांमध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न-नाना पटोले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असून त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष मोर्चेबांधणी करत आहेत. नेत्यांचे विविध पक्षांमधून इनकमिंग आणि आउटगोइंग सुरू आहे. गत विधानसभा निवडणुकीच्या वेळी अनेक नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. तर काहींनी आपल्या पक्षाविरोधात बंड पुकारून भापजसोबत सत्तेत सहभागी झाले. सत्ता टिकवण्यासाठी भाजपने पक्ष फोडाफोडीचे राजकारण सुरू केले आहे, असा गंभीर आरोप नाना पटोले यांनी केला आहे. भाजपला सत्ता गमावण्याची भीती वाटते, त्यामुळे विरोधी पक्षांमध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असेही नाना पटोले म्हणाले. नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधत मोदींना आपली सत्ता टिकण्याची खात्री राहिली नाही. त्यामुळे विरोधकांना पराभूत करण्याऐवजी त्यांचे नेतृत्व आणि पक्षांमध्ये फूट पाडून त्यांना कमकुवत करण्याचे राजकारण सुरू केले आहे. परंतु, याला राजकारण नाही तर सत्ताकारण म्हणतात, अशी टीका पटोले यांनी केली.

# सगरोळी येथील संस्कृती संवर्धन वस्तीगृहाचे अधिक्षक शंकर कुडके यांचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



बिलोली साठेनगर येथील रहिवासी शंकर मारीबा कुडके यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले सगरोळी येथील संस्कृती संवर्धन मंडळतील वसतिगृहाचे अधीक्षक म्हणून काम पाहत होते त्यांच दिनांक १० ऑक्टोबर रोजी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे बिलोली येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते त्यांची प्राणज्योत मालवली त्यांच्यावर बिलोली येथील लघुळ रोड लगत स्मशानभूमी येथे ठीक ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले कुडके परिवारावर दुःखद घटना घडली आहे त्यांच्या आत्म्यास शांती लाभो त्यांच्या पश्चात पत्नी, मुलं, आई, वडील, भाऊ असा मोठा परिवार आहे शंकर कुडके हे पत्रकार गंगाधर मारिबा कुडके यांचे ते छोटे भाऊ होतं कुडके परिवाराला या दुःखातून सावरण्याची ईश्वर शक्ती देवो हीच प्रार्थना

# पंकजाताई यांच्या दसरा मेळाव्यासाठी सर्व समाज बांधवांनी उपस्थित रहावे भा.ज.पा.जिल्हा.सचिव विष्णु डोळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**



देशाचे माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांनी सुरू केलेल्या दसरा मेळाव्याची परंपरा माननीय आ.पंकजाताइ गोपीनाथ मुंडे कायम ठेवली आहे.मुंडे साहेबांवर प्रेम करणारे लोक आजही या दसरा मेळाव्यासाठी गावा गावातुन उपस्थित राहतात या मेळाव्यातुन नव उर्जा घेऊन जातात.पंकजाताईनी हि परंपरा चालू ठेवून.मा.गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या कडुन जी उर्जा मिळायची तीच उर्जा ताईसाहेब यांच्या रुपाने मिळत आहे.

आज ही लाखो महिला पुरुष गोर गरीब ऊसतोड मजूर कामगार व सर्व समाज बांधव या दसरा मेळाव्याची आतुरतेने वाट पाहत असतात.लाखो महिला पुरुष या दसरा मेळाव्यासाठी सावरगाव घाट येथे येत असतात परंपरे नूसार याही वर्षी १२ऑक्टोंबर ला लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भाजपचे बुलढाणा जिल्हा सचिव विष्णु डोळे यांनी केले आहे

लोणार तालुक्यातील गावा गावातुन सर्व समाजातील पुरुष व महिला यांनी उपस्थित राहुन या दसरा मेळाव्यासाठी सावरगाव घाट येथे हजर रहावे व पंकजाताई मुंडे यांच्या कडून नव ऊर्जा घ्यावी असे आवाहन गावा गावात जाऊन करीत आहेत .



**काँग्रेस ओबीसी विभाग लोहा तालुका अध्यक्षपदी दत्ता बंजपल्ले यांना नियुक्ती पत्र देताना जिल्हाध्यक्ष प्रा. आत्माराम वानोळे व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष जे. पी. पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले याप्रसंगी संतोष बारसे नांदेड शहराध्यक्ष विष्णू गोडबोले शिवशंभ स्वामी धनंजय उमरीकर व महेश देशमुख उपस्थित होते**

## कवी-लेखक-साहित्यिकांनी आता मनाशी खुणगाठ बांधावी की

# त्यांची लेखणी ही 'अन्याय,अत्याचार व असत्याच्या विरुद्ध लढणारी समशेर' ठरावी-डॉ.विजयकुमार कस्तुरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धुळे । ज्ञानेश्वर बुधवत**

धुळे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या 'अवधूत प्रकाशन ' संस्थेच्या वतीने मा. डॉ.सदाशिव सुर्यवंशी, केंद्रीय अध्यक्ष - खानदेश साहित्य संघ, महाराष्ट्र राज्य, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दि. २९-०९-२०२४ च्या प्रकाशन सोहळा तथा राज्यस्तरीय कवीसंमेलनाचे उदघाटक या नात्याने, नवोदितंच नव्हे तर प्रस्थापित साहित्यिक कवी आणि लेखकांनी सुध्दा देशाची सध्याची संक्रमणकालीय परिस्थिती विचारात घेता, आपली लेखणी ही अन्याय अत्याचार व असत्याच्या विरुद्ध उठणारी समशेर ठरावी, याचे भान व जाण ठेवण्याची आज गरज आहे, कारण देश चालविणारा पेक्षा देश घडविणारे मोठे असतात - असे भावनिक आवाहन बहुजन साहित्य संघ, चिखली चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ व कवी डॉ. विजयकुमार कस्तुरे, चिखली यांनी आपल्या बहुभाषिय काव्याविष्कारातून केले. या प्रसंगी प्रमुख अतिथी या नात्याने उपस्थित मा. साहित्यिक निर्माता चंद्रशेखर तरारे, मा. महेश पाटील, संचालक, समर्थ अकादमी, साक्री, कवयित्री लेखिका कैलासकन्या ड. सुकन्या महाले तसेच सुप्रसिद्ध शिवव्याख्याते मा. शिवश्री गजानन पाटील यांच्या सह सन्माननीय संमेलन अध्यक्ष डॉ. सदाशिव सुर्यवंशी यांनी सुध्दा आपल्या विद्वत्प्रचूर भाषणामधून सहभागी सर्व कवी-कवयित्री यांच्या रचनांच्या सुक्ष्म समीक्षणासह मोलाचे



मार्गदर्शन करून, आपल्या काव्य लिखाणात जीव ओतून समाजात चैतन्य निर्माण करण्याचा मानस असावा असा कानमंत्र दिला. एवढेच नव्हे तर या कविसंमेलनात निमंत्रित ज्येष्ठ कवी कथाकार डॉ.बबनराव महामुने,हिवरा आश्रम, यांच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या शल्यचिकित्सकीय कवितेने आणि चिखली येथील ज्येष्ठ कवी डॉ. डी. व्ही. खरात सर यांच्या,

सर पावसाची आली, येता येता ओली झाली.....

या प्रतिमा प्रधान कवितेने तसेच ज्येष्ठ कवयित्री विमलताई वाणी यांचे भारूड व कवी गोकूल देवरे,रोहीत ठाकूर, हर्षा चौधरी, मनिषा बिऱ्हाडे तथा अन्य सर्व समर्थ कवी कवयित्री यांनी आपापल्या [illegible] सुंदर आशय प्रधान गझल कविता सादर करून

संमेलनाचा माहौल बदलून टाकला. या संमेलनात तीन काव्यसंग्रहांचे प्रकाशन सर्व मान्यवरांच्या हस्ते होवून पुढील यशस्वी वाटचालीसाठी त्यांना व सकस नवनिर्मितीस्तव उपस्थित कवी लेखकांना शुभेच्छा देण्यात आल्या. या सर्वांगसुंदर साहित्य महोत्सवाच्या आयोजन व यशस्वितेसाठी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा रविना पाटील, उपाध्यक्ष सचिन पवार, सचिव आदित्य गोमटे, उपसचिव धरती मैंद, ऋषिकेश जाधव, रविना जगताप, संयोजिका हर्षाली गांगुर्डे सह इतरही अनेक मित्र मान्यवरांनी अथक परिश्रम घेतले. सदर कर्यक्रम मराठा सेवा संघ, धुळे च्या आबासाहेब उत्तमराव बेडसे सभागृहात संपन्न झाला.

## भगवान भक्तीगडावर 'स्वाभिमानी' विचारांचे सिमोल्लंघन करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहा

### कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगांव (घाट) ता.पाटोदा जि.बीड येथील भगवान भक्तीगडावर सध्या दसरा मेळाव्याच्या तयारीने वेग घेतला आहे. हा दसरा मेळावा हा विचारांचा वारसा आहे. या मेळाव्यात सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पाटोदा/शिरूर (कासार) कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग नागरगोजे यांनी केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या या मेळाव्याकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आमदार पंकजाताई मुंडे आणि



डॉ.प्रितमताई गोपीनाथ मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दरवर्षी हा परंपरागत दसरा मेळावा अलोट जनसागराच्या साक्षीने मोठ्या उत्साहात पार पडत असतो. येत्या १२ तारखेला दसरा आहे, त्या अनुषंगाने 'आपला दसरा, आपली परंपरा' जपण्यासाठी संपूर्ण सावरगांव(घाट) नगरी सज्ज झाली असून सर्व ग्रामस्थ एकजुटीने कामाला लागले आहेत. मेळाव्यासाठी कार्यकर्त्यांच्या राज्यभरात ठिक ठिकाणी बैठका सुरू आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी दसरा मेळाव्याची परंपरा सुरू केली होती. ती परंपरा पुढे भाजपच्या राष्ट्रीय सचिव आमदार पंकजाताई साहेब मुंडे यांनी अखंडपणे सुरू ठेवली आहे. ही परंपरा अशीच सुरू ठेवण्यासाठी स्वाभिमानी विचाराचे सीमोल्लंघन करण्यासाठी महाराष्ट्रातील वंचित, पिडीत, दलितांसह अठरापगड जाती धर्मातील समाजबांधवांनी आपली वज्रमूठ घट्ट ठेवण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग नागरगोजे यांनी केले आहे.

### जयभीम आर्मीच्या बुलढाणा जिल्हा कार्यकारिणीच्या

## पदाधिकाऱ्यांची जिल्हाध्यक्ष आयुष्मान प्रा.भास्कर इंगळे यांच्याकडून नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

बुलढाणा जिल्ह्याचे सुपुत्र तसेच फुले - आंबेडकरी चळवळीत तळागाळातील घटकांच्या सर्वांगीण विकास व कल्याणाची जिद्द उरात घेऊन महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या जयभीम आर्मी चे संस्थापक अध्यक्ष मा. नितिनभाऊ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अध्यक्ष तथा क्रांतिकारी विचारांचे सुप्रसिद्ध संपादक मा. प्रा. भास्कर इंगळे, बुलढाणा यांनी आज बुलढाणा येथे जिमखाना क्लब, बुलढाणा येथील विशेष बैठकीमधे बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष म्हणून आयुष्मान सिध्दार्थ जाधव, बुलढाणा जिल्हा संघटक म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. बबनराव महामुने (



हिवरा आश्रम ) तर बुलढाणा जिल्हा सहसचिव म्हणून सामाजिक कार्यास्तव मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. डी. व्ही. खरात सर, चिखली यांची व सोबतंच चिखली तालुका सचिव या नात्याने सामाजिक कार्यास वाहून घेतलेले आयुष्मान अंकुश पडघान ( बोरगाव काकडे ) अशा मान्यवरांची सन्मानाने नियुक्ती करून त्यांना शाल व पुष्पगुच्छासह नियुक्ती पत्र प्रदान करून त्यांचा गौरव केला. याप्रसंगी फुले-आंबेडकरी चळवळीत सात दशके समर्पित कार्य करणाऱ्या व त्यासाठी अमेरिकन विद्यापीठाची मानद डॉक्टरेट प्राप्त ज्येष्ठ कवी कलावंत व विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे, चिखली तसेच सामाजिक लढाऊ नेता आयुष्मान संदीप शिंदे यांची उपस्थिती होती.

## महिको सिड्सचा पिक पाहणी दौरा प्रगतशील शेतकरी बाळासाहेब कोंबडे यांच्या शेतावर जाऊन केली पिक पहाणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा शहरातील प्रगतशील शेतकरी बाळासाहेब कोंबडे यांच्या शेतावर महिको सिड्स जालना तर्फे समृद्धीचा राजमार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ''बाहुबली या कापूस वाणावर पिक पाहणी कार्यक्रम घेण्यात आला. श्रीगोंदा तालुक्यासह शहरातील प्रगतशिल शेतकरी व वितरक आणि विक्रेते बंधू साठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिको चे रिजनल बिझनेस मॅनेजर श्री सुंदर वायाल यांनी बाहुबली या कापूस वाणांची महत्व पूर्ण माहिती दिली. समृद्धीचा राजमार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाहुबली या कापूस वाणाची वैशिष्ट्ये सांगितले. बाहुबली या वाणाला



भरपूर फुटवा, व रोगप्रतिकार शक्ती जास्त आहे. या वाणाचे बोंडे मोठे असल्याने ते शेतकऱ्याला वेचनिस सोपे आहेत. या एका झाडाला ९० ते ९५ बोंडे आहेत. जास्त फुटवे असल्याने उत्पन्न जास्त मिळते.

प्रगतशिल शेतकरी बाळासाहेब कोंबडे यांच्या शेतातील बाहुबली हा वाण शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्याची स्तुती केली. महिकोचा बाहुबली हा वाण निश्चितच भरघोस उत्पन्न देईल असा विश्वास प्रगतशील शेतकरी बाळासाहेब कोंबडे यांनी व्यक्त केला. या प्रसंगी महिको चे कपाशी वाण बाहुबली ७३५१ गोल्ड, महाराजा, व मका ३८४५, ३८३८ व ४०६४ आणि गहू मुकुट, विक्रांत या वाणापासून भरघोस उत्पन्न कसे घेता येईल याची माहिती महिकोचे जिल्हा व्यवस्थापक श्री भगवान पाटील सर यांनी शेतकरी बंधूना दिली. उत्तम पवार यांनी सर्व शेतकरी बंधू चे आभार मानले. पिक पाहणी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनोद लोंढे, अक्षय भोसले, विशाल सुपेकर यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांनी शेतावर बाळासाहेब कोंबडे यांनी ठेवलेल्या स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

## अंकिता पाटील- ठाकरे यांची रविवार पासून जनसंवाद यात्रा

### इंदापूर तालुक्यात जनतेशी साधणार संवाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या अंकिता पाटील-ठाकरे या इंदापूर तालुक्यात रविवार (दि.१३) पासून जनसंवाद यात्रा काढणार आहेत. या जनसंवाद यात्रेदरम्यान अंकिता पाटील-ठाकरे ह्या इंदापूर तालुक्यात गावोगावी जनतेशी संवाद साधणार आहे.

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षामध्ये राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार,प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील,खा.सुप्रिया सुळे,खा.अमोल कोल्हे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.इंदापूरचा पक्षप्रवेश कार्यक्रम हा न भूतो न भविष्यती असा विक्रमी गर्दीत संपन्न झाला.या



पक्ष प्रवेश कार्यक्रमामुळे तालुक्यातील जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.अंकिता पाटील ठाकरे या जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून नागरिक,युवक, महिला यांच्याशी संवाद साधणार आहेत.

### मुलीने दिलेल्या अवयव दानाने वडिलांना मिळाले जिवदान

# साक्षी रामराव शेळके हिच्या धाडसाने सगळ्यांची मने जिंकली : ऐक मुलगीच ऐवढ करू शकते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

सह्याद्री हॉस्पिटल डेक्कन पुणे येथील डॉ.बिपीन विभुते यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली, मलठण ता. दौंड जिल्हा पुणे येथील तंटामुक्ती गाव समितीचे पहिले अध्यक्ष आणि मलठण गावचे एक आदर्श व्यक्तिमत्व रामराव बबनराव शेळके यांचे यकृत खराब झाले होते, अनेक तपासणीनंतर यकृताचा काही भाग नवीन टाकावा लागणार होता, आपली लाडकी असलेली कन्या साक्षी रामराव शेळके हिने आपल्या स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करण्याचे तिने ठरवले.

डॉक्टर बिपिन विभुते यांनी त्यांच्या नातेवाईकांबरोबर आणि स्वतः साक्षी बरोबर चर्चा केल्यानंतर,साक्षी रामराव शेळके हिने आपले स्वतःचे यकृत दान करण्याचा निर्णय घेतला,तीन महिन्याच्या तपासणीनंतर अनेक चाचण्या करण्यात आल्या आणि गुरुवार दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ म्हणजेच घटस्थापने दिवशी सकाळी सात वाजता सह्याद्री हॉस्पिटल डेक्कन पुणे येथे यकृत दानाची यशस्वी शस्त्रक्रिया संपन्न झाली, सुमारे दहा तास चाललेल्या शस्त्रक्रियेनंतर दोन्ही पेशंट व्यवस्थित सुखरूप आणि शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याची आनंदाची बातमी त्यांनी त्यांच्या उपस्थित नातेवाईकांना सांगितली, नातेवाईकांचा आनंद गगनात मावेनसा झाला होता,

आनंद अस्श्रुने नातेवाईकांचा बांध फुटला होता, यकृत बदलने हे नाव जरी ऐकले तरी अंगावर काटा येतो,यकृत खराब झाले नंतर जगण्याचा मार्ग कमी जास्त कठीण झालेला असतो,अशा या कठीण



परिस्थितीत त्यांची कन्या साक्षी रामराव शेळके हिने दाखविलेल्या धाडसाचे कौतुक करायला शब्द च नाहीत,मलठण येथील नावाजलेल्या कुटुंबा पैकी हे एक शेळके कुटुंब आहे.

सगळे काही आलबेल चालु असताना वकिली पदवी मिळवलेले रामराव बबनराव शेळके हे गेले अकरा महिन्यापासून यकृताच्या आजाराने आजारी होते ,हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना डॉक्टर बीपीन विभुते यांनी त्यांचे यकृत बदलण्याचा निर्णय घेतला होता, काहीही करुन मी माझेच यकृत दान करनार असलेचे साक्षी रामराव शेळके हिने स्पष्ट सांगितले, आणि डॉ. बिपिन विभुते यांनी सुद्धा तिला होकार दिला,अनेक चाचण्या केले नंतर यशस्वी शस्त्रक्रिया संपन्न झाली.

आज दोन्ही पेशंट सुखरुप आणि सुरक्षित आहेत,सध्या साक्षी रामराव शेळके ही घरी येऊन विश्रांती घेत आहे,तर रामराव बबनराव शेळके हे सध्या हॉस्पिटलमध्ये च उपचार घेत असुन त्यांना सुद्धा लवकर घरी सोडण्यात येणार असल्याचे हॉस्पिटल प्रशासनाने सांगितले आहे.यकृताच्या गंभीर आजारावर मात करीत आज पुन्हा नव्या जोमाने जिवन जगण्याचा रामराव बबनराव शेळके यांचा मार्ग मोकळा झालेला आहे.

ते पुन्हा नव्या जोमाने आपला संसार,आपला प्रपंच,आपले सामाजिक कार्य पुढे चालू ठेवतील यात अजिबात शंका नाही.आणि त्याचा अभिमान त्यांच्या नातेवाईकांना,गावकऱ्यांना,त्यांच्या सर्व मित्र परिवारांना वाटतो आहे,पण या यशस्वी पित्याला आपली लाडकी कन्या साक्षी रामराव शेळके हिचे योगदान खुप मोलाचे आहे. तिचे कार्य खुप अनमोल कौतुकास्पद,प्रेरणादायी आणि विचार करनारे नक्कीच आहे. म्हणून तिच्या या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904